# हसत जगावं
# जगत हसावं


**प्रा. रा. तु. भगत**



**रिया पब्लिकेशन्स्, कोल्हापूर**

---

प्रमुख वितरक

**अजब डिस्ट्रिब्युटर्स**

६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.



**हसत जगावं जगत हसावं : प्रा. रा. तु. भगत**



© **प्रा. रा. तु. भगत**



'शिवसुंदर' मोहिते पार्क,
रंकाळा, कोल्हापूर.



**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
२५०, ब-३०, शीतल बंगला,
नागाळा पार्क, कोल्हापूर.

**प्रमुख वितरक**
अजब डिस्ट्रिब्युटर्स
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
मोबा. : ९४२२४२१५०२

**अक्षरजुळणी**
मुजीब मुल्ला

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
श्री ज्योतिर्लिंग ऑफसेट, कोल्हापूर.

**आवृत्ती**
सप्टेंबर, २०१२

**किंमत**
रुपये १००/-

हसत जगावं !
जगत हसावं !!

## हसता हसता

कोणते अपयश आले म्हणून आपण असे कपाळाला हात लावून बसलात? कसले दु:ख झाले म्हणून आपण असे निराश झालात? कोणत्या परीक्षेत नापास झालात म्हणून आपण असे रडत बसलात ? प्राप्त परिस्थितीशी आपण धैर्याने सामना देऊ शकत नाही. हेच आपल्या दु:खाचे खरे कारण आहे. आपल्यासमोर संकटे आली, की ती हसतमुखाने झेलण्यात खरा पुरुषार्थ असतो. आपण संकटांना नाही संकटे आपणास घाबरली पाहिजेत. तरच आपण संकटमुक्त होऊन आनंदाने जगू शकतो. आपल्या वेदना, आपल्या चिंता, आपल्या समस्या आणि आपले दु:ख आपणास अपयशाकडे घेऊन जाणाऱ्या वाटा आहेत. आपले यश आणि आनंद वाढवायचा असेल तर चिंतामुक्त होऊन चैतन्यमय जीवनाशी हातमिळवणी केली पाहिजे, तरच आपल्या मनात आनंदाची पहाट फुलेल. आपल्या मनाच्या आकाशातील स्वार्थ, अहंकार, द्वेष, मोह, लोभ आणि तिरस्कार यांचा आधार संपला की निर्मल आनंदाचा उष:काल होईल. अशा आनंदाच्या डोही सर्वांना सुस्नात करण्यासाठीच हा शब्द-सेतू बांधला आहे.

आपल्या जीवनात अनेक प्रकारचे ताण-तणाव असतात. कधी भावनिक, कधी मानसिक, कधी शारीरिक, कधी बौद्धिक, कधी सामाजिक, कधी सांस्कृतिक तर कधी परिस्थितीजन्य असे अनेक प्रकारचे ताण-तणाव असतात. अशा ताण-तणावांशी यशस्वीपणे सामना करण्यासाठी प्रत्येक माणसाचा जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन योग्य असावा लागतो. प्रत्येकाचे आपले एक प्रकारचे तत्त्वज्ञान असते. दृष्टिकोन असतो. जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन जितका निकोप आणि विवेकनिष्ठ असेल त्याप्रमाणात ताण-तणावावर मात करणे सुलभ होईल. कधी-कधी आपणच आपल्या दु:खाची कुऱ्हाड आपल्या पायावर मारून घेत असतो. आपणच अशा प्रकारे आपली फजिती करून घेत असतो. अशी आपली फजिती होत असताना आपणच आपल्या नशिबाला दोष देण्यात काय अर्थ आहे? कर्तव्यशून्य माणसे वारंवार आपली फजिती करून घेत असतात. कर्तव्यतत्पर माणसे आपल्या विवेकशक्तीच्या

बळावर यशाकडे सतत वाटचाल करीत असतात. कर्तबगार माणसे आपला मोठेपणा सांगत सुटत नाहीत. त्यांच्या कार्यातूनच त्यांचा मोठेपणा सिद्ध होत असतो. 'मौल्यवान हिरा कधी आपली किंमत सांगत नाही' या वचनातील रहस्य प्रत्येकाने ओळखले पाहिजे, तरच आपणास प्राप्त परिस्थितीतून निर्माण झालेल्या संकटाशी दोन हात भरून यश मिळविता येईल.

आपण जगावे कसे? गंगेच्या पाण्यासारखे ! आपण काम करावे कसे? अगदी उत्तुंग हिमालयासारखे ! मग आपली कीर्ती ताऱ्यासारखी जगभर पसरेल.

सुरतसे कीरत बडी ।
बिनपंख उड जाए ।
सुरती तो चली जाती है ।
कीरती कब हु न जाए ।।

'मरावे परी किर्तीरूपे उरावे' म्हणतात ते याच अर्थाने. पण एवढे प्रत्येकाला कसे जमेल? जरा व्यावहारिक पातळीवर येऊन विचार केला तर आपण सर्वजण प्रथम प्राप्त परिस्थितीचे दास आहोत. त्यामुळे परिस्थितीपुढे नमते घेऊन आपणास जावे लागते. पंरतु सगळेच परिस्थितीचे दास असत नाहीत. परिस्थितीचे स्वामी होऊन परिस्थितीवर काहीजण आपला प्रभाव पाडतात. असे लोक धैर्यवान असतात. विवेकनिष्ठ असतात. त्यामुळे ते हसतमुखाने संकटाशी तोंड देत असतात. हसत जगणे आणि जगत हसणे ही एक कला आहे. ती सर्वांना जमत नाही. म्हणून अनेकजण चिंताक्रांत होऊन बसतात. हसत-हसत संकटाशी सामना करणे सर्वांना जमत नाही. खरेतर हसणे हे सर्व प्रकारच्या समस्यांवरील रामबाण औषध आहे. ते देवाने आपणास मोफत दिले आहे. त्याचा उपयोग न करता काही लोक मुखदुर्बळतेने संकटाच्या आहारी जातात. दुःखी होऊन बसतात. यासाठी 'हसावे आणि हसत जगावे' या विचाराचे महत्त्व अनेक उदाहरणांतून वाचकांना पटवून देण्यासाठी हे शब्दभांडार सर्वांपुढे खुले करून ठेवले आहे.

आनंद ही हास्याची पहिली पायरी आहे. जगताना आनंद झाला की हास्याची उकळी फुटते. खळखळून हसणे ही तर निर्मळ मनाची साक्ष असते. काही माणसे कधी हसतच नाहीत. अगदी धीर-गंभीरपणे जगत असतात. त्याच्याकडे पाहिले की, आता फार मोठा 'भूंकप' होणार आहे की काय असे वाटते. अशा जगण्यामुळे ही माणसे स्वतः दुःखी असतात आणि इतरांनाही दुःखी करुन सोडत असतात. पर्णपुष्पहीन झाडासारखी ही माणसे जगत असतात. हसरी माणसे मोहोरलेल्या आंब्याच्या झाडासारखी असतात. मधमाशाचे मोहोळ त्याच्यावर तुटून पडते. जसे गुळाला मुंगळे चिकटतात तशी हसऱ्या माणसाभोवती अनेक माणसे येतात. 'ज्यांना हसता येते त्यांनी दुकान काढावे' अशी एक चिनी म्हण आहे. तिचा भावार्थ ज्यांना समजेल त्यांना जीवनातील कोणत्याही क्षेत्रात यशस्वी होता येईल.

या छोटेखानी पुस्तकाच्या वाचनातून आपणास आनंदाने, हसतमुखाने आणि आशावादी विचाराने जगण्याचा मार्ग सापडला, तर या पुस्तकाचे सार्थक झाले असे म्हणायचे ! या पुस्काच्या वाचनातून हसत जगण्याची आणि जगत हसण्याची उर्मी वाचकांच्या मनात उचंबळून येईल असी अशा वाटते.

**प्राचार्य रा. तु. भगत**
'शिवसुंदर'
मोहिते पार्क, रंकाळा
कोल्हापूर - ४१६०१२

## अनुक्रम


| | | |
|---|---|---|
| १. | पुढे व्हा ! | ९ |
| २. | प्रेम हाच खरा धर्म असतो. | ११ |
| ३. | मेरा पैगाम इन्सानियत है। | १३ |
| ४. | हसत जगावे, जगत हसावे. | १५ |
| ५. | संकटे धडा शिकवून जातात. | १७ |
| ६. | पुष्पासंगे मातीस वास लागे. | १९ |
| ७. | जेथे इच्छा तेथे मार्ग | २१ |
| ८. | जगण्यात आनंद आहे. | २३ |
| ९. | ही गोष्ट आहे स्वातंत्र्याच्या आनंदाची ! | २५ |
| १०. | सृजनाला पाहिजे आत्मविश्वासाचा सहवास | २७ |
| ११. | सच्चा मोती | २९ |
| १२. | ब्रह्मानंदसहोदराची पहिली पायरी | ३१ |
| १३. | क्षण एक पुरे आनंदाचा ! | ३३ |
| १४. | देशाच्या मातीशी इमान राखा ! | ३५ |
| १५. | अंधारातून प्रकाशाकडे जा ! | ३७ |
| १६. | खरी भक्ती हीच आनंदाची सृष्टी होय. | ३९ |
| १७. | वतन हैं हिंदोस्ताँ हमारा ! | ४१ |
| १८. | मानवधर्म श्रेष्ठ असतो. | ४३ |
| १९. | एक आनंददायक अनुभव | ४५ |
| २०. | योग्य तेच करावे. | ४७ |
| २१. | उचंबळले हे सरोवर आनंदाचे ! | ४९ |
| २२. | तेथेच आनंदाला उधाण येते. | ५१ |
| २३. | आनंदमय जीवनासाठी ! | ५३ |
| २४. | आनंद - सूर्याचे दर्शन घडू द्या ! | ५५ |
| २५. | फुलू दे नव आशेचे अंकुर ! | ५७ |
| २६. | धीरापोटी असती फळे रसाळ-गोमटी ! | ५९ |
| २७. | हिंमतवान व्हा ! | ६१ |
| २८. | दया धर्म का नाम है। | ६३ |

| | | |
|---|---|---|
| २९. | यशस्वी जीवनाचे रहस्य | ६५ |
| ३०. | अनुभव हीच ज्ञानाची माता असते. | ६७ |
| ३१. | तरच हे विश्व आनंदाचे अंगण होईल. | ६९ |
| ३२. | पर्यटन आनंदाचे पर्व ठरेल ! | ७१ |
| ३३. | जीवन अनमोल आहे. | ७३ |
| ३४. | हेच आनंदाचे लक्षण आहे. | ७५ |
| ३५. | खरा आनद | ७७ |
| ३६. | पाच नाजूक बोटे ! | ७९ |
| ३७. | हाच आनंदाचा खरा अर्थ होय. | ८१ |
| ३८. | तरच जग आनंदाचे आवार होईल. | ८३ |
| ३९. | आनंदवनाचे धनी | ८५ |
| ४०. | एक फिरते विद्यापीठ | ८७ |
| ४१. | दोन गोष्टी | ८९ |
| ४२. | आनंदाची पहाट फुलवू द्या ! | ९१ |
| ४३. | नीती-अनीती मनोधारणेत असते. | ९३ |
| ४४. | आनंदाने जगण्याचा मार्ग | ९५ |
| ४५. | जो चुकतो तो सुधारतो. | ९७ |
| ४६. | आनंद अंत:करणात लपलेला असतो. | ९९ |
| ४७. | सप्तसूर्याच्या प्रकाशात | १०१ |
| ४८. | आनंदाने जगण्याचा नवा पाठ. | १०३ |
| ४९. | धन्य ती माता ! धन्य तो पुत्र ! | १०५ |
| ५०. | स्वत:बरोबर इतरांना आनंदित करावे | १०७ |
| ५१. | आनंदाच्या शोधात | १०९ |
| ५२. | खरी संस्कृती | १११ |
| ५३. | आनंद तरंग | ११३ |
| ५४. | हे निर्झर आनंदाचे ! | ११५ |
| ५५. | सुखी माणसाचा सदरा | ११७ |
| ५६. | दान हेच सर्वात मोठे बक्षीस आहे. | ११९ |
| ५७. | ऐश्वर्याचे भूषण दान असते. | १२१ |
| ५८. | हाच उच्चकोटीचा आनंद होय. | १२३ |
| ५९. | धैर्यवान मुलेच देशाची संपत्ती असते. | १२५ |
| ६०. | आनंदाचे डोही | १२७ |

# १. पुढे व्हा

एक होता लाकूडतोड्या. दररोज जंगलातील लाकडे आणून विकत असे. पोट भरत असे. कधी कधी रिकाम्या हाताने तो परत येत असे. अशा वेळी बायकोस उपाशी झोपावे लागत असे. दररोज त्याच्या घरावरून एक भिकारी जात असे. ज्यावेळी भाकरी वाढता येत नसेल त्यावेळी त्याची बायको आतूनच त्या भिकाऱ्यास 'पुढे व्हा' असे म्हणत असे. एके दिवशी तो लाकडे तोडण्यास बाहेर पडायला व भिकारी दारात यायला एकच गाठ पडली. त्या भिकाऱ्यास पाहून त्याची बायको म्हणाली, 'पुढे व्हा.' लाकूडतोड्यास वाटले की, आज बायकोने आपणास 'पुढे व्हा' असे म्हटले. तो विचार करत चालू लागला. मी दररोज लाकडे विकतो म्हणून कसेबसे पोटाला मिळते. आज भुकेने व्याकूळ होऊन बायको 'पुढे व्हा' असे म्हणाली असावी, असे लाकूडतोड्यास वाटले. आज त्याने जंगलात थोडे पुढे जाऊन लाकडे आणण्याचे ठरविले. पुढे होताच खूप लाकडे मिळाली. ती विकून तो आनंदाने धान्य घेऊन घरी परतला. त्याचा आनंद पाहून बायकोने कारण विचारले. तो म्हणाला, 'आज जंगलात जाताना तूच सांगितलेस 'पुढे व्हा' म्हणून ! आणि आनंदाचे कारण काय विचारतेस?' हे ऐकून बायको काहीच बोलली नाही. दुसरे दिवशी लाकूडतोड्या जंगलात आणखी पुढे गेला. त्यामुळे खूप लाकडे मिळाली. मग दिवसातून दोनदा जाऊ लागला. एकदा तर तो जंगलात फारच पुढे गेला. तेथे त्याला चंदनाची झाडे दिसली. तो चंदनाची लाकडे विकू लागला. खूप श्रीमंत झाला. एके दिवशी तो आपल्या बायकोस म्हणाला, 'पाहिलंस का? आपण म्हणत होतो की, ही गरिबी देवाने दिली आहे. पण या अगोदर मी



पुढे पुढे गेलो असतो तर एवढी गरिबी भोगावी लागली नसती. जो पुढे जातो त्याचे नशीब उघडते.' आपल्या कामाशी, परिश्रमाशी बांधील राहणे म्हणजे जीवनावर प्रेम करणे होय. श्रमाच्याद्वारे जे जीवनावर प्रेम करतात त्यांनाच जीवनाचा खरा अर्थ कळतो. आपल्या जीवनाची सारी प्रेरणा ही आंधळी आहे - जर ती ज्ञानयुक्त नसेल तर ! आपले सारे ज्ञानही निरर्थक आहे - जर ते श्रमरहित असेल तर ! आपण प्रेमाने श्रम करतो तेव्हा आपण स्वत:शी, परस्पराशी आणि परमेश्वराशीही बांधले जातो. श्रम म्हणजे प्रेमाचे मूर्त स्वरूप होय. आपणास जर प्रेमाने श्रम करता येत नसतील तर ते काम सोडून द्यावे आणि देवळाच्या दारात बसून आनंदाने परिश्रम करणाऱ्यांकडून भिक्षा घ्यावी हे बरे ! आपण जर मन न लावता भाकरी भाजत असाल तर ती कडू होण्याची शक्यता नाकारता येत नाही. अशी भाकरी माणसांची भूक भागवेल असेही सांगता येत नाही. मन लावून केलेल्या कामातून खरा आनंद मिळत असतो.

***